**आकाशवाणी नागपूर**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक २६ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

- कारगिल युद्ध म्हणजे सत्य, संयम आणि सामर्थ्याचं अद्भुत दर्शन असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
- नागपुरात विविध उपक्रमांनी कारगिल विजय दिवस साजरा, केन्द्रीय संचार ब्यूरोच्या 'कारगिल युद्धआधारित' मल्टीमीडिया दोन दिवसीय प्रदर्शनीच आज उदघाटन.
- '२०४७ चा विकसित भारत' या संकल्पनेवर नीती आयोगाच्या 9 व्या नियामक मंडळाची बैठक उद्या नवी दिल्ली इथं होणार.
- पॅरिस ऑलिम्पिकचं आज औपचारिक उद्घाटन.

****

**कारगिल विजय दिवस**

२५ वा कारगिल विजय दिवस आज साजरा होत आहे. या निमित्त राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी तिन्ही सैन्यदलाचे आभार व्यक्त करत हुतात्मा सैनिकांना अभिवादन केलं. समाज माध्यमांवरील आपल्या संदेशात त्यांनी, कारगील युध्दात धारातीर्थी पडलेल्या सैनिकांचं बलिदान देशाच्या प्रत्येक नागरिकाला राष्ट्रभक्तीची प्रेरणा देईल असं म्हटलं आहे. कारगिलमध्ये २५ वर्षांपूर्वी आपण केवळ युद्धच जिंकलं नाही तर सत्य, संयम आणि सामर्थ्याचं अद्भुत दर्शन घडवल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांनी आज कारगिल मधल्या द्रास इथं युद्ध स्मारकाला भेट देऊन, हुतात्मा सैनिकांना आदरांजली अर्पण केली, त्यानंतर ते बोलत होते. भारत शांततेसाठी प्रयत्न करत होता, मात्र पाकिस्ताननं आपला अविश्वासी चेहरा समोर आणला, असं ते म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही कारगिल युद्धातील वीरांना अभिवादन करत आपण त्यांचे शौर्य कायम आठवणीत ठेऊन कोणत्या ना कोणत्या स्वरूपात देशाची सेवा केली पाहिजे असं म्हटलं आहे. २५ व्या कारगिलविजय दिवसानिमित्त आज त्यांनी या युद्धात शहीद झालेल्या महाराष्ट्रातल्या सहा जवानांचं स्मरण केलं, त्यावेळी ते मुंबईत बोलत होते.

कारगिल विजय दिवस - विदर्भ

भारतामध्ये राहणारा प्रत्येक नागरिक तितकाच देशभक्त आहे, जितके की सैन्याचे जवान. फक्त फरक इतकाच आहे की सैन्याच्या जवानांना रोज देशभक्ती दाखविण्याची संधी मिळते.तर सामान्य माणसाला देशभक्ती दाखविण्याची जास्त संधी मिळत नाही. केंद्रीय संचार ब्यूरोच्या 'कारगिल विजय दिवस-रजत जयंती' मल्टी मिडीया छायाचित्र प्रदर्शनी हा भारत सरकारचा उपक्रम आहे, जो सामान्य नागरिकांना देखील आपली देशभक्ती व्यक्त करण्याची संधी देतो, असं प्रतिपादन निवृत्त एअर वाइस मार्शल सूर्यकांत चाफेकर यांनी केलं. आज कारगिल विजयाला २५ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त या युद्धात आपल्या शौर्य आणि पराक्रमानं भारताला विजय मिळवून देणाऱ्या शूर सैनिकांच्या सन्मानार्थ, भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत येणाऱ्या केन्द्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय, नागपूर आणि व्हीएमव्ही वाणिज्य, जे.एम.टी.कला आणि जे.जे.पी.विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानं आज आणि उद्या महाविद्यालय प्रांगणात 'कारगिल विजय दिवस-रौप्य जयंती' या विषयावर दोन दिवसीय मल्टिमीडिया फोटो प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. आज सकाळी निवृत्त एअर व्हाईस मार्शल सुर्यकांत चाफेकर यांच्या प्रमुख उपस्थित प्रदशनीचे उदघाटन झाले त्यावेळी ते बोलत होते. तर उद्या समारोप सत्रात निवृत्त मेजर जनरल एपी बाम यांची उपस्थिती राहील. या छायाचित्र प्रदर्शनात कारगिल युद्धाशी संबंधित दुर्मिळ छायाचित्रे पाहायला मिळतील, तसेच युद्धात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहीद कॅप्टन विक्रम बत्रा यांच्यासह इतर सैनिकांबद्दल आणि युद्धात वापरलेल्या शस्त्रास्त्र तसच उपकरणांबद्दल माहिती दर्शकांना मिळेल. हे प्रदर्शन सर्वांसाठी नि:शुल्क उपलब्ध आहे. कारगिल विजय दिवसा निमित्त कारगिल युद्धात आपल्या शूरवीरांनी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाचा सन्मान करण्यासाठी नागपूर येथे एअर मार्शल विजय कुमार गर्ग, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. तत्पूर्वी, वायुसेना नगर, ते फुटाळा तलावापर्यंत सायकल रॅली काढण्यात आली. वायुसेनेचे अधिकारी, जवान आणि एनसीसीचे विद्यार्थी यात सहभागी झाले होते. नागपूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय नागपूरतर्फे रेशिमबाग स्थित कविवर्य सुरेश भट सभागृह इथं आज सायंकाळी 4 ते 7 या वेळेत कारगिल युद्धामध्ये शहीद झालेल्या शूर वीरांना संगीतमय श्रद्धांजली देण्यात येत आहे. याशिवाय हेडकॉटर मेंटेनन्स कमांड तर्फे कारगिल विजय दिवसानिमित्त विविध कार्यक्रमान्च आयोजन करण्यात आलं, यात 'वीर नारींचा सन्मान करण्यात आला. कारगिल विजय दिनाच्या रजत जयंतीनिमित्त माजी वायू सैनिक कल्याण संघटना, अमर जवान स्मारक

समितीच्या वतीने नागपुरातील अजनी चौक येथील अमर जवान स्मारकाला सलामी देऊन अभिवादन करण्यात आलं. माजी वायू सैनिक कल्याण संघटनेच्यावतीनं 28 जुलै रोजी सकाळी 8:30 वाजता अजनी चौकात अमर जवान रॅली आयोजित करण्यात येणार आहे. या रॅलीमध्ये कारगिल युद्धातील क्षणचित्रे पोस्टरच्या माध्यमातून प्रदर्शित करण्यात येणार आहे. रॅलीचा समारोप सकाळी ११.३० वाजता होईल ज्यात निवृत्त एअर मार्शल शिरीष देव यांच्या हस्ते कारगिल युद्धात प्रत्यक्ष सहभागी झालेल्या निवृत्त सैनिकांना सन्मानित करण्यात येणार आहे. कारगिल दिवसाच्या पूर्व संध्येला काल भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने नागपुरात नितीन गडकरी यांच्या घरापासून ते शहीद चौक पर्यंत बाईक रैलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेला हातात तिरंगी झेंडे घेत, भारत माता की जय अश्या घोषणा देत ही बाईक रैली काढण्यात आली. यावेळेला आमदार प्रवीण दटके देखील रैलीत सहभागी झाले होते. अकोल्यात आज आजी-माजी सैनिक, सेवाभावी संस्था आणि तीक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीतर्फे कारगिल विजय दिवसानिमित्त दुचाकी रॅली काढण्यात आली.

संसद-लोकसभा

2018 पासून नियुक्त झालेल्या उच्च न्यायालयातील 661 न्यायाधीशांपैकी 21 न्यायाधीश हे अनुसूचित जाती प्रवर्गातील, 12 अनुसूचित जमाती प्रवर्गातील, 78 इतर मागासवर्गीय प्रवर्गातील आणि 499 न्यायाधीश सामान्य श्रेणीतील आहेत. ही आकडेवारी या महिन्याच्या 22 तारखेपर्यंत असल्याची माहिती कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी आज लोकसभेत दिली. सरकार सर्व समुदायाच्या प्रतिनिधित्वासाठी कटिबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं.

संसद-राज्यसभा

केंद्र सरकारने अनेक पिकांच्या किमान हमीभावात मोठ्या प्रमाणात वाढ केल्याचं, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं आहे. ते आज राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होते. केंद्रसरकार सातत्याने शेतकऱ्यांच्या लाभासाठी निर्णय घेत असल्याचं त्यांनी नमूद केलं. गेल्या अनेक वर्षात गव्हासह इतर पिकांचं सरकारकडून खरेदीचं प्रमाण वाढलं असून, खतांवरच्या अनुदानातही भरघोस वाढ केल्याचं चौहान यांनी नमूद केलं. राज्यसभेत शून्य काळात खासदार सुधा मूर्ती यांनी,

हॉटेल व्यावसायिकांकडून अन्नपदार्थात वापरल्या जाणाऱ्या सिन्थेटिक रंग, सिन्थेटिक व्हिनेगर तसंच टेस्टिंग पावडरच्या दुष्परिणामांकडे लक्ष वेधलं. यासंदर्भात नियंत्रणासाठी देशभरात शंभरावर अन्न परीक्षण प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचं, अन्न प्रक्रिया मंत्री चिराग पासवान यांनी सांगितलं. खासदार रजनी पाटील यांनी कृषी प्रक्रिया उद्योग उभारणीत होणाऱ्या विलंबाकडे सदनाचं लक्ष वेधलं. पासवान यांनी यावर उत्तर देतांना, तांत्रिक कारणांमुळे ही प्रक्रिया लांबत असल्याचं सांगत, सरकार या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करून सदर प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याच्या प्रयत्नात असल्याचं सांगितलं.

**पंतप्रधान-नीती आयोग**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं राष्ट्रपती भवनाच्या सांस्कृतिक केंद्रात, नीती आयोगाच्या 9 व्या नियामक मंडळाच्या बैठकीची अध्यक्षता करतील.
या वर्षीच्या बैठकीची मध्यवर्ती संकल्पना "Viksit Bharat@2047" ही आहे. या बैठकीत विकसीत भारतासाठीच्या दृष्टीसाठी 'अप्रोच पेपर'वर चर्चा होणार आहे. नियामक मंडळाच्या बैठकीचे उद्दिष्ट हे ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येचं जीवनमान सुधारण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार यांच्यातील सहभाग आणि सहकार्याला चालना देणे आहे असं नीती आयोगातर्फे कळविण्यात आलं आहे.

**शपथविधी**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी रविवार दिनांक २८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता विधानभवनातील मध्यवर्ती सभागृहात होणार आहे.

**निवडणूक तयारी**

महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगान तयारी सुरू केली आहे. त्यासाठी राज्यातील मतदार याद्या अद्ययावतीकरणाचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. भारत निवडणूक आयोगाने १ जुलै २०२४ रोजीच्या अर्हता दिनांकाच्या आधारे मतदार याद्यांचा 'दूसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण' कार्यक्रमाच वेळापत्रक निश्चित केले होते, त्यात आता सुधारणा करण्यात आली आहे, अशी माहिती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये दिली आहे.

## पॅरिस ऑलिम्पिक

पॅरिस ऑलिम्पिकचं आज औपचारिक उद्घाटन होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री ११ वाजता हा सोहळा सुरु होणार आहे. या स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच उद्घाटन समारंभ मैदानाच्या बाहेर होत असून, अंदाजे दहा हजारावर खेळाडू संचलनात सहभागी होणार आहेत. आयफेल टॉवर परिसरात संचलनाची सांगता होऊन ऑलिंपिक ज्योत प्रज्वलित केली जाईल. या संचलनात भारतीय पथकाचं नेतृत्व शरथ कमल आणि पी. व्ही. सिंधू करणार आहेत.

## आशिया चषक

महिला आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात भारताने बांगलादेशच्या संघावर दहा गडी राखून विजय मिळवला. बांगलादेशच्या संघांने दिलेलं 81 धावांचं लक्ष भारतीय संघानं अकराव्या शतकात एकही गडी न गमावता 54 चेंडू राखून सहज साध्य केलं. भारतातर्फे स्मृती मंधना हिने 55 तर शेफाली वर्मा हिने 24 धावा करत विजय मिळवला.

## नक्षलवाद्याची हत्या

गडचिरोली जिल्हयात नक्षलवाद्यांनी आज शुक्रवारी पहाटे एका माजी नक्षलवाद्याची गोळ्या घालून हत्या केली. जयराम कोमटी गावडे असे या नक्षलवाद्याचं पूर्वाश्रमीचं नाव असून तो भामरागड तालुक्यातील आरेवाडा येथील रहिवासी होता.

## हवामान

विदर्भात आज चंद्रपूर ,गोंदिया आणि गडचिरोली या जिल्हयांमध्ये मध्यम ते जोरदार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, याच तिन्ही जिल्हयांमध्ये उद्या मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय 30 जुलै पर्यंत संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमान राहणार असल्याने येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.गेल्या 24 तासात गडचिरोली जिल्हयातील भामरागड येथे सर्वाधिक 89 पूर्णांक 1 मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान

आठवडाभरापासून मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने चंद्रपूर जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पोंभुर्णा येथील विश्रामगृहात आज आढावा बैठक घेतली. तत्पूर्वी बाधित गावांचा दौरा करून त्यांनी पूरपीडितांच्या समस्या ऐकून घेतल्या.

*****